Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - V MAY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरीतील शिकवन

**विष्णू मुकुंदराव चापके**
एम.ए.एम.एड., एम. फील.

ज्ञानेश्वरी हि गितेवरची टिका होय. श्रीमदभागवदगिता हा हिंदुचा धर्म ग्रंथ आहे. याचा अर्थ ज्ञानेश्वरी हि सुध्दा धर्मग्रंथ होय. गिता हि संस्कृत भाषेत असुन ज्ञानेश्वरी हि मराठीत आहे गितेत सातशे श्लोक आहेत तर ज्ञानेश्वरीत अठरा हजार ओव्या आहेत.

संस्कृत मधील ज्ञान हे मराठी भाषेत आणण्याचे काम ज्ञानेश्वरांनी केले आहे. विविध दृष्टांत देउन ज्ञानेश्वरांनी कठिण सिंध्दात सोप्या भाषेत समजावून सांगितले आहेत.

ज्ञानेश्वरीत उपदेश केला आहे. ज्ञानेश्वरीतील शिकवन हि सर्वांनसाठी आहे. ज्ञानेश्वरीत एकूण अठरा अध्याय आहेत. मुख्य उपदेश अर्जुनाला केला आहे. कारण अर्जुन मोहग्रस्त व कर्तव्यच्युत झाला होता. त्याला मोहातून बाहेर काढण्याचे काम श्रीकृष्णाने केले आहे.

तेव्हा दुसऱ्या अध्यायात अर्जुनाला जो उपदेश केला त्यालाच ज्ञानयोग किंवा आत्मज्ञान सांगितले पण हे आत्मज्ञान अर्जुनाला काहि आत्मसात झाले नाही. म्हणून त्यांच्या योग्यतेनुसार आत्मज्ञानाचे मुख्य चार मार्ग सांगितले आहे. त्यात आत्मज्ञानांचा मार्ग हा दुसऱ्या अध्यायात सांगितला आहे आणि आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर मानसाचे वर्तन कसे बदलते. कोणते लक्षण त्यात दिसतात याचे हि वर्णन त्या अध्यायात दिले आहे. तिसऱ्या अध्यात कुवती प्रमाणे कर्म करावे जसे कि पक्षी फळांकडे सहज उडत जातो पण मनुष्य फांदि फांदिने फळापर्यंत पोहचतो त्या प्रमाणे मनुष्याच्या योग्यतेनुसार त्याला आपल्या क्षमतेने कर्म करावे लागते ते कर्म मात्र निष्कामा कर्म करावे लागते. कर्तुत्वमद व फलास्वाद टाकून कर्म करावे म्हणजेच कर्मयोग होय याने आपले काहि काळाने अंतकरण शुध्द होउन आत्माज्ञान मिळते. चौथा अध्यायात ज्ञानकर्म संन्यासयोग आहे तर पाचवा अध्याय हा कर्मसंन्यासयोग आहे सहाव्या अध्यायात राजयोग सांगितला आहे.

राजयोगात स्वतःचा स्वतः उध्दार करावा लागतो. त्यासाठी कोणती तयारी करावी लागते याचे वर्णण या अध्यायात केलेले आहे. कुंडलीनी कशी जागृत करावी याचे वर्णण या अध्यायात दिसून येते राजयोग एक प्रकारे शास्त्र आहे येथे कशावरही विश्वास ठेवायची गरज नाही. प्रत्यक्ष अनूभवच घ्यायचा असतो. सातवा अध्याय ज्ञानविज्ञान आहे. तर आठवा अध्याय हा अक्षरब्रम्हयोग आहे यात ब्रम्ह म्हणजे काय यांची चर्चा केली आहे नववा अध्याय हा राजरोग राजगृहय योग आहे. दहाव्या अध्यायात मुख्य मुख्य विभूती सांगितल्या आहेत. अकाराव्या अध्यायात तर संपूर्ण विश्व कसे एक आहे विश्वस्पदर्शनयोग या अध्यायात प्रत्यक्ष अनूभव यात दाखवलेला आहे.

अर्जुन कसा भितीने व्याकूळ झाला आणि त्याची कशी मनस्थिती झाली याचे वर्णन या अध्यायात दिसून येते. बाराव्या अध्यायात ईश्वर उपासना कशी करावी याचे वर्णन दिसून येते. आजच्या काळात हा मार्ग सर्वसामान्य माणसाला झेपणारा आहे म्हणून याचे महत्व फार आहे. समर्पण भावनेने शरण येणे येथे अपेक्षित असते. तेराव्या अध्यायात क्षेत्राचा विचार मांडलेला आहे तर चौदाव्या अध्यायात गुणत्रय विभाग मांडलेला आहे. पंधराव्या अध्यायात माणसाने कसे पुरूषोत्तम व्हावे त्यासाठी कसे प्रयत्न करावे याचे मार्गदर्शन केले आहे.

सोळावा अध्याय हा दैवासुर संपत्तीयोगाचा असनू दैवी संपत्ती कशी व कोणती आहे तसे असून संपत्ती कोणती व कशी असते याचे वर्णन या अध्यायात केले आहे. सतराव्या अध्यायात तर श्रध्दा कशी असते याचे वर्णन या अध्यायात केले आहे. अठराव्या अध्यायात संपूर्ण ज्ञानेश्वरीचे सार सांगितले आहे. यात संपूर्ण ग्रंथाचे सार या अध्यायात सांगितले आहे.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ प्रासादिक ग्रंथ आहे. या ज्ञानेश्वरीचा अर्थ आणि मर्म कळाले की माणुस हा मुक्त होतो. सर्व मोहमाया नष्ट होतात आणि तो दैवीगुण संपादन करणारा एखादा महापुरूष बनतो.

सर्वसाधारणपणे शब्द साहित्याच्या माध्यमातून लिखाणाचे कार्य करणाऱ्या लेखनिकांस लेखक असे

म्हणतात. लेखक अथवा लेखिका आपल्या जीवनातील अनुभवसिध्द ज्ञानास अथवा कल्पना विचारांना मूर्त स्वरूपात प्रगट करीत असतात. प्राचीन पुरातन ऐतिहासिक कालापासून आजपर्यंत कितीतरी साहित्यिक होवून गेलेले आहेत. कवीवर्य मुकुंदराज, चक्रधर स्वामी आणि संत सम्राट सदगुरू ज्ञानाबारायांच्याही नंतर अव्याहतपणे आजपर्यंत अनेक नामांकित लेखकांनी जनमानसात अत्यंत आदराचे स्थान प्राप्त केलेले आहे.

उपरोक्त नामनिर्देशीत प्रभूतींच्या नंतर सदगुरू ज्ञानोबारायांच्या आदेशाचे पालन करीत ज्ञानेश्वरी ग्रंथाचे सिध्दहस्त लेखन करणारे सच्चिदानंद बाबा हे खऱ्या अर्थाने मराठी सारस्वतातील आद्य लेखक म्हणून प्रकाशात आले. स्वतः श्री ज्ञानोबारायांची सच्चिदानंद बाबांना मोठया आदराने लेखक म्हणून पदवी दिली. आपल्या अव्दितीय, अप्रतिम, शब्दवाकचातुर्याने, ऐश्वर्याशाली प्रतिभासामर्थ्य संपन्नतेने ज्ञानदेवांच्या मुखातुन प्रगट झालेल्या ओवीबध्द ईश्वरी ज्ञानाच्या म्हणजेच ज्ञानेश्वरीच्या प्रगटीकरणास जशीच्या तशी उपलब्ध पत्रपटांवर उतरविण्याचे महान कार्य सच्चिदानंदबाबांनी केले. त्या लिखाणाव्दारा संपूर्ण मानव जातीवर केवढे प्रचंड उपकार झाले ते सांगता येत नाही. शोकग्रस्त अर्जुनाच्या शोक निवारणार्थ भगवान श्रीकृष्णाच्या मुखातून निघालेला श्रीमदभगवदगीतारूपी अमृत उपदेश, महाभारताच्या निमित्ताने व्यासमहर्षींनी जर आपल्या संग्रही ठेवला नसता तर मानव जातीचे अपरिमित नुकसान झाल्याशिवाय राहिले नसते.

**"सौ बका और एक लिखा"** या हिंदी भाषेतील उक्तिनुसार सांगणाऱ्यापेक्षा लिहिणाऱ्याचे पारडे जड झालेले दिसते, म्हणुन कधी कधी वक्ता श्रेष्ठ कि त्या वक्त्याचे श्रवण करून त्यांचे शब्द लिहून ठेवणारे श्रेष्ठ ? याबद्दल सर्वसामान्यास संभ्रम होउ शकतो. आपण याचा निर्णय न करता वक्ता आणि श्रोता-लेखक या दोघांचाही यथोचित आदर केला पाहिजे. याबाबतीत वैदिक परंपरेच्या तत्वाज्ञानाची प्राणपणाने परंपरा जोपासणाऱ्या सदुरू ज्ञानोबारायांसहित, समकालीन सर्व संत मंडळी, संत शिरोमणी, नामदेवराय, शांतीब्रम्ह संत एकनाथराय, जगदगुरू तुकोबाराय, संत रामदास स्वामी, संत निळोबारायांपासून तर वर्तमान काळापर्यंतच्या विद्यमान सर्व लेखकांनाही अत्यंत आदराचे स्थान द्यावे लागेल.

मानवी जीवन सुखप्रवृत्त असले तरीही सुखी नाही. जीवदशा ही सुखाची जाणीव करून देणारी असली तरीही आनंदस्वरूप, सर्वसुखरूप नाही. महाभारताच्या नियमानुसार **सुखास्यानन्तरं दुःख दुःखस्यानन्तरं सुखम! पर्यायेणोपसर्पन्ते नरं नेमिमरा इव !!** असेच जीवदशेचे वर्णन करता येईल. वेदान्तदृष्टीने सुख व दुःखाच्या अनुभवापेक्षाही त्यांच्या उपादानाचे ज्ञान यथार्थ अधिक महत्वाचे असते. सुख-दुःख नेमके जीवनामध्ये प्रविष्ट होतात कसे याचा विचार अधिक प्रकर्षाने झाला पाहिजे. त्यातही सुख हे जीवाचे स्वरूप असेल तर त्याची नित्य अनुभूती जीवास येत नाही. ज्याने ते तिरोहित झालेले आहे त्याची निवृत्ती होणे आवश्यक आहे, त्यानंतर सुखरूपता तर आहेत! श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, **वारा आभाळचि फेडी! वाचूनि सूर्याते न घडी ! कां हातु बाबुळी धाडी ! तोय न करी !! तैसा आत्मदर्शनी आडळु ! बसे विद्येचा जो मळु ! ते शास्त्र नाशी येरू निर्मळु ! मी प्रकाशे स्वये !!** गीतेचे महिमान गाताना हे श्री ज्ञानेश्वर महाराज सांगतात. सारांश मानवी जीवनातील अज्ञानजन्य दुःखामुळे सुखस्वरूप झाकले जाते. आणि कारणाच्या अज्ञानामुळे जीव दुःखामध्ये जन्मोजन्मी खितपत पडतो. तात्पुरती उपाययोजना दुःखाच्या कारणाचे निर्मूलन करू शकत नाही.

मानवी जीवनाचे जवळून दर्शन आणि मानवी जीवनातील समस्यांच्या निराकरणाचे अखंड चिंतन संतांच्या अंतःकरणामध्ये अखंड चालू असते. सदगुरू ज्ञानेश्वर महाराजांनी समाजाचे जवळून अवलोकन केले. समाजातील विचारांनी व दुःखांनी कष्टी झाले आणि याचे उत्तरही त्यांना सापडले ! संतवाडमय! संतवाडमयाची श्रध्दायुक्त चिकित्सा हा सर्व दुःखावरचा उपाय असतो. संतवाडमय हा जसा उपासनेचा विषय आहे, त्याचप्रमाणे चिंतन मनन विचाराकडे प्रवृत्त करणारे, सखोल, सूक्ष्म व व्यापक विचार करायला शिकविणारेही आहे. पारमार्थिक विचार संसारात क्रियेतून कसे प्रकट करावयाचे, त्यात सहजता व स्वाभाविकता कशी असावी हे संतवाडमय मातृस्नेहाने **'एक घास ठिस ठायी'** करून पढविते. योगवसिष्ठ म्हणते, **दीर्घसंसाररोगस्य विचारो हि महौषधम!** हा विचार संतवाडमयामधूनच जीवनामध्ये उरतो. यानेच भवरोगाचे म्हणजे सर्व दुःखाचे निराकरण होते. सर्व संतांनी केलेला हाच विचार सदगुरू ज्ञानेश्वर महाराजांनी केला.

**संदर्भ ग्रंथ :**

१. ज्ञानेश्वरांचे व्यक्तीमत्व लेखक प्रा. डॉ. पाटील सुशिला
२. सार्थ ज्ञानेश्वरी लेखक प्रा. गो. वि. दांडेकर
३. ज्ञानेश्वरी लेखक श्री. किसन साखरे
४. शैक्षणिक तत्वज्ञान लेखक श्री. म. बा. कुंडले
५. शिक्षणाचे तात्वीक व समाजशास्त्रीय अधिष्ठान लेखक
डॉ. बाबासाहेब गोरे